महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय(पुरवठा शाखा)

दुरध्वनी क्रमांकः-०२३५२/२२२४१२ ई-मेल – dso_ratnagiri@rediffmail.com


NO.DSO-RTN/Desk-10/G.O/2017 दि. 17/03/2017

## जाहीरनिविदा

जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांचेकडून रत्नागिरी जिल्हयातील गोदाम निहाय मंडणगड, दापोली, खेड, गुहागर, चिपळूण, संगमेश्वर, रत्नागिरी, लांजा, राजापूर या तालुक्यातील शासकिय धान्य गोदामातील दिनांक ०१/१०/२००९ ते ३१/१२/२०१२ या कालावधीत शिल्लक असलेल्या उपयोगी, निरुपयोगी व तुकडा बारदानाची विक्री ई-लिलावाव्दारे (E- auction) जेथे असतील तसे व जेथे असतील तेथून या तत्वावर करावयाची आहे.

बारदानाचा साठा ज्या स्थितीत आहे तेथून उचलणेचा आहे. शासकिय धान्य गोदामातील रिकाम्या बारदानासाठी एकच दर सादर करणेचा आहे. शासकिय धान्य बारदानाची निर्धारित/ अपेक्षित हातची किंमत निश्चित केली असून ती खालील प्रमाणे आहे.

| | एकुण संख्या | दर | एकुण किंमत |
|---|---|---|---|
| उपयोगी बारदान (५० किलो) | ५१८७५ प्रती नग | रु. ५.५०/- प्रती नग | २८५३१२.५०/- |
| निरुपयोगी बारदान (५० किलो) | ६०१७५ प्रती नग | रु. ०३.००/- प्रती नग | १८०५२५.००/- |
| तुकडा बारदान | ४० किलो | रु. ०.५०/- प्रती किलो | २०.००/- |
| | | | **४६५८५७.५०/-** |

| उपयोगी बारदान (५० किलो) | निरुपयोगी बारदान (५० किलो) | तुकडा बारदान |
|---|---|---|
| रु. ५.५०/- प्रती नग | रु. ०३.००/- प्रती नग | रु. ०.५०/- प्रती किलो |

**निविदामध्ये दर नमुद करताना ते वरील दिलेल्या हातच्या किमंती पेक्षा जास्त असावेत.**

ई-लिलाव (E-auction) प्रक्रियेसाठी सर्व इच्छुक निविदाकार/खरेदीदार/कंपनी/फर्म यांना वैयक्तीक डीजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र ( Digital Signature Certificate) काढणे आवश्यक आहे.

तरी सर्व इच्छुक निविदाकार/खरेदीदार/कंपनी/फर्म यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, डीजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र विहीत मुदतीत प्राप्तकरुन ई-लिलाव प्रक्रीयेत जास्तीत जास्त सहभाग घ्यावा.

इच्छुक निविदाकार/खरेदीदार/कंपनी/फर्म यांना ई-निवीदेत विहीत मुदतीत भाग घेणेसाठी http:// eauction.gov.in या वेबसाईटवर संगणकीय नोंदणी (Online Registration) काढणे आवश्यक आहे. तसेच ई-मेल आयडी, राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाची प्रत अपलोड करणे, पॅन कार्ड, टॅन नंबर अपलोड करुन रजिस्ट्रेशन करता येईल. ज्या खरेदी दाराने वरील प्रमाणे संगणकीय नोंदणी (Online Registration) केली असेल व आवश्यक बयाना रक्कम **रु.२०,०००/-** जिल्हाधिकारी,रत्नागिरी यांचे नावे स्टेट बँक ऑफ ईडिया, शाखा रत्नागिरी देय असलेल्या राष्ट्रीयंकृत बँकेचा धनाकर्ष **दिनांक- ३१/०३/२०१७** रोजी ०५.०० वाजेपर्यंत किंवा त्या पुर्वी या कार्यालयात जमा केलेला असेल त्यांनाच ई-लिलावाव्दारे (E-auction) पध्दतीमध्ये भाग घेता येईल.

रत्नागिरी जिल्हयातील शासकिय गोदामातील रिकामा बारदानाचा ई-लिलावाव्दारे (E-auction) साठी खालील प्रमाणे वेळापत्रक निश्चित करणेत आलेले आहे.

| अं.क्र. | दिनांक | तपशील |
|---|---|---|
| १ | दि.12/04/2017 ते<br>दि.26/04/2017 | ई-लिलावाव्दारे (E-auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी (Online Registration) करणे, राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्षाची प्रत, पॅन कार्ड, रहिवासी पुरावा अपलोड करणे. |
| २ | दि. 27/04/2017 ते 28/04/2017 सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | ई-लिलावाव्दारे (E-auction) करणेसाठी संगणकीय नोंदणी केलेल्या खरेदीदाराच्या अर्जाची छाननी करुन पात्र/ अपात्र खरेदीदार ठरविणे. |
| 3 | दि. 29/04/2017 | ई-लिलाव खालीलप्रमाणे करणेत येईल.<br>उपयोगी बारदान (५० किलो)- सकाळी ११.०० ते ११.३०<br>निरुपयोगी बारदान (५० किलो)- सकाळी ११.३० ते दुपारी १२.००<br>तुकडा बारदान - दुपारी १२.०० ते १२.३० |
| 4 | टिप | ई-लिलाव समाप्तीचे वेळी बोली न आल्यास संगणकीय प्रणालीव्दारे प्रत्येक १० मिनीटाप्रमाणे ३ (तीन) वेळा वाढ करणेत येईल. |

सर्वोच्य ई-लिलावाव्दारे (E-auction) धारकास **पॅन कार्ड, मोबाईल नंबर, टॅन नंबर (सर्टीफिकेट),रहिवासी पत्ता** इत्यादी कागदपत्रे लिलाव प्रक्रीया संपताच जिल्हाधिकारी कार्यालय,(पुरवठा विभाग) रत्नागिरी येथे सादर करावी लागेल. निवीदेतील अटी व शर्ती http://eauction.gov.in व www.ratnagiri.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आल्या असून अधिक माहीतीसाठी पुढील दुरध्वनीवर संपर्क साधावा. **(०२३५२) २२२४१२** तसेच निविदेच्या अटी व शर्ती जिल्हाधिकारी कार्यालय,(पुरवठा विभाग) रत्नागिरी येथे कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहेत. निविदा स्विकारणेचे अथवा नाकारण्याचे अथवा पुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणेचे अधिकार जिल्हाधिकारी रत्नागिरी यांना राखून ठेवणेत आलेले आहेत.

**जिल्हाधिकारी, रत्नागिरी**

## निविदेच्या महत्वाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे आहेत.

१) निविदेमधील बारदानाचा साठा संबंधित धान्य गोदामात सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

२) बारदानसाठा ज्या परीस्थितीत आहे, त्या परीस्थितीत त्या गोदामातून स्वखर्चाने उचलावा लागेल.कोणत्याही परिस्थितीत बारदान निवडून घेता येणार नाही.

३) लिलाव मंजूर होणा-या लिलावधारकाने मंजूरीचा आदेश मिळाले तारखेपासून सात दिवसाच्या आत बारदानाच्या किंमतीच्या ¼ रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच राहिलेली रक्कम आठ दिवसात भरुन सर्व बारदान स्वखर्चाने उचलावे लागेल, तसेच बारदान किंमतीवर हाताळणुक कर २ टक्के व विक्री कर ५ टक्के स्वतंत्ररित्या एकाचवेळी शासनाकडे जमा करावा लागेल.

४) मान्य निविदाकारास बारदान उचलीचा आदेश निर्गत करणे पुर्वी बारदान निविदेतील वरील प्रमाणे सर्व अटी व शर्ती मान्य असेल्याबाबत रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्र सादर करावे लागेल.

५) लिलाव मंजूर झालेल्या तारखेपासून ३० दिवसाच्या मुदतीमध्ये बारदान साठा न उचलल्यास अनामत म्हणून जमा केलेली रक्कम सरकारी खजिन्यात जमा केली जाईल. त्यावर लिलावधारकांचा कोणताही हक्क राहणार नाही.तसेच सदर बारदानाचा फेरलिलाव करून लिलावामध्ये जर मंजूर निविदेपेक्षा कमी रक्कम आली तर फरकाची रक्कम संबंधित निविदा धारकाकडून वसुल करण्यात येईल. अशा निविदाकारावर दंडनीय कारवाई करणेत येऊन त्याचे नांव काळया यादीत समाविष्ट केले जाईल.

६) बारदान पाहूनच निविदा सादर करणेची असलेने,निविदा सादर केल्यानंतर बारदानाच्या प्रती बाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

७) बयाना रक्कम म्हणुन मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे नावे रक्कम रु. **२००००/-** (वीस हजार मात्र) राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी.सोबत जोडावा. ज्याचे नावे निविदा मंजूर होणार नाही, त्यांची बयाणा रक्कम निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

८) निविदा कोणतेही कारण न दाखवता मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार जिल्हाधिकारी व महाराष्ट्र शासनाचे अधिकारात राहिल.

९) मालावर लागू असलेले शासकीय कर, स्थानिक संस्था कर व इतर अनुषंगिक कर (उदा.विक्री कर,आय कर, जकात कर इ.) खरेदीदारास स्वतः भरावे लागेल.

१०) निविदेसोबत सन २०१४-१५ चे आयकर थकीत नसलेचे प्रमाण पत्र जोडणेत यावे.

११) कोणत्याही कारणास्तव रक्कम हप्ता पद्धतीने भरणेची मुभा दिली जाणार नाही. किंवा तशी विनंती यशस्वी निविदाकारास करता येणार नाही.

१२) निविदा मंजूर झाल्यास काही कारणास्तव यशस्वी निविदाकाराने बारदानाची रक्कम भरणा केली नाही व करारनामा करणेस नकार दिला तर अशा निविदाकारांची सुरक्षा अनामत व बयाणा रक्कम सरकार जमा करणेत येईल.

१३) करारपत्र केल्यानंतर यशस्वी निविदाकाराने बारदान खरेदीस नकार दिल्यास अशी भरणा केलेली बारदानाची किंमत सरकार जमा करणेत येइल व वसुलीबाबत कार्यवाही करणेत येईल.

१४) निविदा प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्या नंतर ज्या निविदाकाराची निविदा अंतिम होईल, त्याचा अहवाल प्रशासकीय विभागास मान्यतेसाठी सादर केला जाईल व शासनाची केलेल्या कार्यवाहीस मान्याता प्राप्त झाल्यानंतर बारदान उचलीबाबतचा (डिलिव्हरी) आदेश देण्यात येईल.

**जिल्हाधिकारी, रत्नागिरी**